**वादीचा सा. क्र. १ यांचा उलटतपास प्रतिवादीचे वकील श्री पी. एस. रामटेके यांचेव्दारे शपथेवर सुरुः**

निशाणी क्र. २७ वरील गट क्र. १२६ चा सात बारा आराजी २० आर ही जमिन हेमंतकुमार चांदेवार व पुंडलिक चांदेवार यांच्या नावाने दर्ज आहे. निशाणी क्र. २८ वरील गट क्र. १२५ चा सात बारा आराजी ०.७९ आर हे हेमंतकुमार व पुंडलिक चांदेवार यांच्या नावाने दर्ज आहे. हे म्हणणे खरे आहे की नि. क्र. २७ व २८ च्या शेतजमिनी विक्रीपत्र क्र. ३७२/१९९६ च्या नुसार प्रतिवादी क्र. १ व २ च्या नावाने विकत घेतले आहेत. नि. क्र. १७ वरील गट क्र.२०३/१ आराजी ०. ५५ व नि. क्र. १८ वरील गट क्र. २१०/१ आराजी १.४४ हया शेतजमिनी पुंडलिक बापुनाथ चांदेवार, हेमंतकुमार बापुनाथ चांदेवार, लहु बापुनाथ चांदेवार यांच्या नावे संयुक्त माझ्या वडीलाने विकत घेतले आहेत.

हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलाने ज्या शेती विकत घेतल्या त्या तिन्ही मुलाच्या नावाने विकत घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की पुंडलिक धानाचा व्यापार करीत होता. आम्ही वेगवेगळे राहत आहोत. हे म्हणणे खरे आहे की आमचे आपसी हिस्सेबटवाडे झालेले आहे. मी फक्त अडीच एकर शेती पेरतो. मी जी शेती पेरतो तिचा गट नंबर मला माहीत नाही. मी खामखुर्रा ची शेती पेरतो. मी पेरत असलेल्या शेतीची आराजी मला माहीत नाही. एकाच ठिकाणची अडीच एकर जागा मी पेरतो. हे म्हणणे खरे आहे की अडीच एकराचा कुठल्याही शेतीच्या गटाचा सात बारा मी दाव्यामध्ये दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की वादी व प्रतिवादी यांच्या नावाने अडीच एकर जागेचा कुठलाही सात बारा मी दाव्यामध्ये दाखल केला नाही व वादी व प्रतिवादी यांच्या नावाने कुठलाही अडीच एकराचा सात बारा नाही.

माझी आई कोरोनामध्ये मरण पावली. माझी आई माझ्याकडे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईच्या हिस्स्याची जागा मी पेरत होतो. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील मालगुजार होते व खाउन पिवून सुखी होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलाकडे ट्रक्टर, ट्राली, धानचुरणी मशिन होते. हे

म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलाकडे गाय व म्हैशी ५० ते ६० होत्या. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईकडे दागदागिने होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईकडे ४० तोळा सोन्याचे दागिने होते. हे म्हणणे खरे नाही की माझी आई माझ्याकडे राहत असल्यामुळे तिने सदर दागिने मला दिले. हे म्हणणे खरे नाही की मी सोन्याचे कोणतेही हिस्सेबटवाडे केले नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर सोना माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादी क्र. १ ते ३ ला सोन्याचे कोणतेही हिस्से दिले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की मी सोना बघितला नाही.

मी प्रस्तुत केस हिस्सा व कब्जासाठी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की मी प्रस्तुत केसमध्ये १००/— रुपयाचा स्टॅम्पपेपरवर २००/— रुपयाची तिकीट लावलेली आहे. साक्षीदार स्वताहुन सांगतो की मला कोर्ट फिसबाबत माहीती नाही. मला लिहीता वाचता येत नाही. मी नि. क्र. १४ वरील माझे शपथपत्र वाचले नाही. माझ्या वकीलाने मला वाचून दाखविला होता. माझे शपथपत्र माझ्या वकीलाने बनविले.

**प्रतिवादीचे वकीलाच्या तोंडी विनंतीवरुन पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब—**

समक्ष,

श्रवणोत्तर स्विकृत

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.03.18 16:46:24 +0530

(एन.व्ही. साहू)

दि.१८.०३.२०२६

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अर्जुनी/मोरगांव